नियमित दिवाणी दावा क्र. 56/2018
सुरेखा विरूध्द शंकर
CNR No. MHPA140004572018

## निशाणी क्र. 5 वरील आदेश

1. प्रस्तुत अर्ज वादी यांनी मौजा आडगाव सुगाव, तालुका पुर्णा, जिल्हा परभणी येथील शेत सर्वे नंबर 28, गट नंबर 109 मधील 8 हेक्टर 32 आर माणिकराव तुकाराम कदम यांचा हिस्सा 3 हेक्टर 69 आर पैकी वादी क्र. 1 व 2 यांनी खरेदी केलेले क्षेत्रफळ 2 हेक्टर 69 आर हया कोरडवाहू शेतजमिनी वरील वादींचे ताब्यास कोणताही अडथळा निर्माण करू नये असा तात्पुरता मनाई हुकुम प्रतिवादी विरूध्द पारीत होण्याकरीता दाखल केला आहे. सदर मालमत्तेस यापुढे आदेशामध्ये वारंवारीता टाळण्याकरीता ''वाद मालमत्ता'' असे संबोधण्यात येईल.

2. प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादी हजर झाले असून त्यांनी निशाणी क्र. 14 प्रमाणे आपला लेखी जबाब सादर केला आहे.

3. अभिलेखाचे अवलोकन केले. वादीतर्फे व प्रतिवादी तर्फे विद्वान वकिलांचे युक्तिवाद ऐकले. वादीने दाखल केलेला अर्ज, प्रतिवादीचा लेखी जबाब व दोन्ही पक्षांनी दाखल केलेल्या दस्तऐवजावरुन तसेच युक्तिवादावरुन खालील मुद्दे काढलेले असून त्या अनुषंगाने त्या पुढे कारणासह अभिप्राय नोंदविलेला आहे.

| अ.क. | मुद्दे | अभिप्राय |
|---|---|---|
| 1 | वादीचा सदरचा अर्ज सकृतदर्शनी आहे का ? | .... होय. |
| 2 | अनुकुलतेचा कल वादीच्या बाजूने झुकतो काय ? | .... होय. |

| | | |
|---|---|---|
| 3 | वादीचे बाजूने तात्पुरता मनाई हुकुमाचा आदेश पारीत न केल्यास प्रतिवादी पेक्षा वादीचे अपरिमीत नुकसान होईल काय ? | .... होय. |
| 4 | आदेश काय ? | .... अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**मुद्दा क. 1 ते 3 करीता :–**

4. वादीने वाद मालमत्तेचे माणिकराव तुकाराम कदम यांनी करून दिलेले करून दिनांक 26.02.2001 रोजीचे नोंदणीकृत खरेदीखत, फेरफार नोंदवहीची नक्कल, शेत गट नंबर 109 चा 7/12 चा उतारा व गाव नमुना 8 अ ची नक्कल, शेत गट नंबर 109 चा टोच नकाशा, वाद मालमत्तेच्या चर्तुसिमेबाबत स्वयं घोषणापत्र, पोलिस स्टेशन, चुडावा येथे दिनांक 14.06.2018 रोजी दिलेल्या तकारीची प्रत, उप अभियंता बांधकाम, जिल्हा परिषद उप विभाग, परभणी यांनी दिनांक 20.11.2017 रोजी सचिन सुर्यप्रकाश कमळू यांना दिलेले पत्र, दिनांक 14.06.2013 रोजी उप विभागीय अधिकारी सार्वजनिक बांधकाम उप विभाग पुर्णा यांनी वादी क. 1 यांना दिलेले पत्र, दुय्यम निबंधक श्रेणी 1, पुर्णा यांचे दिनांक 13.05.2013 रोजीचे व दुय्यम निबंधक श्रेणी 1, पुर्णा यांना सह जिल्हा निबंधक, परभणी यांनी दिलेले पत्र दाखल केले आहे. तसेच, वादींनी नियमित दिवाणी दावा क. 86/2013 चे वादपत्राची व अर्ज निशाणी क. 5 प्रमाणित प्रत दाखल केली आहे. या अपरोक्ष प्रतिवादींनी शेत गट नंबर 109 चा 7/12 उतारा व गाव नमुना 8 अ ची नक्कल दाखल केली आहे.

5. वादींची असे कथन आहे की, त्यांनी एकत्रितरित्या वाद शेतजमिन प्रतिवादी यांचे वडील माणिकराव तुकाराम कदम यांचेकडून दिनांक 26.02.2001 रोजी नोंदणीकृत खरेदीखताद्वारे खरेदी केलेली आहे. वादी सदर 2 हेक्टर 69 आर शेतजमिनीची वहिती करतात. वादी सदर शेतजमिनीचे कायदेशिर मालक व ताबेदार आहेत. सदर खरेदीखतावरून वादीचे नावे फेरफार नोंद झालेली आहे. प्रतिवादीचे

वडील माणिकराव हे दिनांक 24.01.2003 रोजी मरण पावले. वादींचे नावे वाद शेत जमिनीचे खरेदीखत करून दिले आहे. सदर खरेदीखतामध्ये चर्तुसिमा नमुद करताना चुक झालेली आहे. प्रत्यक्षात सदर वाद शेत जमिनीच्या पुर्वेस सुभाष संभाजी यांचे शेत, पश्चिमेस रस्ता, दक्षिणेस लक्ष्मण जळबाजी यांचे शेत व उत्तरेस रस्ता आहे. वादीने सहाय्यक जिल्हा निबंधक, परभणी यांच्याकडे दिनांक 30.04.2013 रोजी चर्तुसिमा दुरूस्तीकरीता अर्ज दिला होता. सदर अर्जाप्रमाणे त्यांनी दुय्यम निबंधक कार्यालय, पुर्णा यांना दिनांक 13.05.2013 रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. परंतु, प्रतिवादी यांनी वादीच्या विनंतीला जुमानले नाही. प्रतिवादी वाद मालमत्तेवरील वादींच्या ताब्यास अडथळा निर्माण करीत आहे.

6. दिनांक 26.02.2001 रोजीचे नोंदणीकृत खरेदीखतावरून प्रथमदर्शनी असे दिसते की, प्रतिवादीचे वडील माणिकराव तुकाराम कदम यांनी वाद शेत जमिन 3 हेक्टर 69 आर वादींना विक्री केलेली आहे. सदर खरेदीखतानुसार वादींचे नावे वाद मालमत्तेची फेरफार नोंद झालेली आहे व 7/12 उता—यावर सुध्दा वादी क्र. 1 व 2 यांच्या नावे एकत्रितरित्या 2 हेक्टर 69 आर एवढया जमिनीची नोंद झालेली आहे.

7. प्रतिवादींचे थोडक्यात असे कथन आहे की, वादींचे नावे असलेले खरेदीखत बनावट आहे. त्यातील चर्तुसिमा खोटया आहेत. गट नंबर 109 पैकी 54 आर शेतजमिन आजही वादीची वडीलोपार्जित शेत जमिन असून त्यांच्या ताब्यात व वहितीत आहे. प्रतिवादीने वादी यांचे विरोधात नियमित दिवाणी दावा क्र. 86/2013 दाखल केलेला आहे.

8. वादीने नियमित दिवाणी दावा क्र. 86/2013 मधील वादपत्राची व निशाणी क्र. 5 वरील तात्पुरत्या मनाई हुकुमाचे अर्जावरील आदेशाची नक्कल अभिलेखावर दाखल केली आहे. सदर तात्पुरत्या मनाई हुकुमाचा अर्ज खारीज करण्यात आलेला आहे. यावरून प्रथमदर्शनी असे दिसून येते की, वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान शेतजमिनी संबंधी वाद आहेत तसेच दोन्ही पक्षांनी एकमेकांचे

मालकी हक्कास व ताब्यास नकार दिलेला आहे.

9. वादीने दाखल केलेल्या कागदपत्रांवरून प्रथमदर्शनी असे दिसून येते की, वादीचा शेत गट नंबर 109 मधील 2 हेक्टर 69 आर जमिनीवर ताबा आहे. तसेच, वादींचे नावे असलेले दिनांक 26.02.2001 रोजीचे खरेदीखतास प्रतिवादीने आजपर्यंत कोणत्याही न्यायालयात आव्हान दिलेले नाही. त्यामुळे, सदर खरेदीखतास वाद शेत जमिनीच्या चुकीच्या चर्तुसिमा नमुद करण्यात आल्या फक्त एवढया कारणावरून वादींचा वाद मालमत्तेवर प्रथमदर्शनी ताबा नाही, असा, अगदी प्राथमिक अवस्थेमध्ये म्हणजेच निशाणी क. 5 वरील अर्ज निकाली काढताना निष्कर्ष काढता येणार नाही. त्यामुळे, माझया मते वाद मालमत्तेवर वादीचा प्रथमदर्शनी ताबा दिसून येतो.

10. प्रतिवादी वाद मालमत्तेवरील ताब्यास अडथळा निर्माण करीत आहेत याबाबत पोलिस स्टेशन चुडावा येथे तक्रार देण्यात आलेली आहे. त्यामुळे, माझ्या मते वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान असलेले वाद लक्षात घेता, नजिकचे काळात वादीचे वाद मालमत्तेवरील ताब्यास अडथळा होण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रस्तुत प्रकरणातील सोयीचा तोल वादीचे बाजुने असल्याचे दिसते. तसेच, वादीच्या बाजुने प्रथमदर्शनी प्रकरण आहे. अशा परिस्थीतीत, प्रतिवादीने वादीचे वाद मालमत्तेवरील ताब्यास अडथळा निर्माण केल्यास किंवा कायदेशिर प्रक्रियेचा अवलंब न करता वादीस वाद मालमत्तेतून बेदखल केल्यास वादीचे कधीही न भरून निघणारे नुकसान होउ शकते.

11. वरील कारणमिमांसेचा सारांश असा आहे की, वादी यांनी प्रथमदर्शनी मुद्दा क. 1 ते 3 सिध्द केलेले आहेत. परिणामतः मी मुद्दा क. 1 ते 3 यास होकारार्थी उत्तर दिले आहे. त्यामुळे वादीचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. करीता मी मुद्दा क. 4 करीता खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

1. वादीचा अर्ज निशाणी क्र. 5 मंजुर करण्यात येतो.

2. प्रतिवादी यांनी अथवा त्यांच्या मार्फत इतर कोणीही निशाणी क्र. 1 व निशाणी क्र. 5 मध्ये नमुद असलेल्या चर्तुसिमेनुसार मौजा आडगाव सुगाव, तालुका पुर्णा, जिल्हा परभणी येथील शेत सर्वे नंबर 28, गट नंबर 109 मधील 8 हेक्टर 32 आर पैकी माणिकराव तुकाराम कदम यांचा हिस्सा 3 हेक्टर 69 आर पैकी वादी क्र. 1 व 2 यांनी खरेदी केलेले क्षेत्रफळ 2 हेक्टर 69 आर हया वाद मिळकतीवरील वादीचे ताब्यास कायदेशिर प्रक्रियेचा अवलंब न करता कोणताही हरकत व अडथळा निर्माण करू नये, असा तात्पुरता मनाई हुकुम प्रतिवादी यांचे विरूध्द या दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत देण्यात येतो.

3. अर्जाचा खर्च मुळ दाव्याचे निकालावर.

स्वाक्षरीत/—
(टी. एच. शेख)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर
पुर्णा

दिनांक : 07.02.2019